# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २०/०८/२०१८

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथील पोलीस नाईक कर्मचाऱ्यास दोनशे रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांनी रिक्षा व्यवसायासाठी बॅच काढला होता. सदर बॅच काढण्यासाठी पोलीस पडताळणी ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती त्यासाठी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथून पडताळणी ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी तक्रारदार हे पोलीस स्टेशनला गेले असता तेथील पोलीस नाईक उत्तम गट यांनी तक्रारदार यांना बॅचसाठी आवश्यक असणारे पोलीस पडताळणीचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी पाचशे रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २०/०८/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक उत्तम गट नेमणुक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन याने तक्रारदार यांच्या बॅचसाठी लागणारे पोलीस पडताळणी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी पाचशे रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती दोनशे रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक २०/०८/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक उत्तम जनार्दन गट, वय - ३८, पोलीस नाईक ब.नं. १७५८, नेमणुक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर याने तक्रारदार यांचेकडून २००/- रूपयांची लाचेची रक्कम विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे सत्यमेव जयते

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned by CamScanner